वर्ष- ११ | अंक- १७ | मुंबई, मंगळवार,११ मार्च ते १७ मार्च २०२५ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

PG 2

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

घरातील या ठिकाणी चुकूनही ठेवू नये धन

3 → जा जरा इतिहासाकडे...

रस्ते जोडणी आणि खोदकामामुळे सर्वत्र धुळीचे वातावरण ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## दोन करबुडव्यांनी महापालिकेचे २१ कोटी थकवले

**मुंबई :** मालमत्ताकर थकवणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांविरोधात महानगरपालिकेने जप्ती आणि लिलाव कारवाईचा धडाका सुरू केला आहे. या अंतर्गत महानगरपालिकेच्या करनिर्धारण व संकलन खात्याने सोमवारी एकूण २ मालमत्तांवर जप्ती आणि अटकावणीची कारवाई केली. यात दोन खासगी विकासकांच्या मालमत्तांचा समावेश आहे. भूखंड मालमत्ता करापोटी १ चटईक्षेत्र निदेर्शांक (एफएसआय) प्रमाणे या दोन थकबाकीदार आस्थापनांकडे दंड रकमेसह एकूण २१ कोटी ६३ लाख ५६ हजार ८६७ रूपयांची थकबाकी आहे. थकबाकीदार आस्थापनांनी विहित २१ दिवसात करभरणा न केल्यामुळे पालिकेकडून कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. महानगरपालिका प्रशासनाने सातत्याने आवाहन करुन आणि पाठपुरावा केल्यानंतरही मालमत्ता कर भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या मालमत्ताधारकांवर महानगरपालिकेच्या वतीने जप्ती आणि अटकावणीची कारवाई करण्यात येत आहे. या मालमत्तांमध्ये भूखंड आणि निवासी - व्यावसायिक इमारती, व्यावसायिक गाळे, औद्योगिक गाळे आदींचा समावेश आहे. महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अश्विनी जोशी यांच्या आदेशानुसार आणि सहआयुक्त विश्वास शंकरवार यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांकडून करसंकलन करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सर्व संबंधितांनी दिलेल्या मुदतीत करभरणा करावा आणि दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई टाळावी,असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून वेळोवेळी केले जात आहे. असे असतानाही कर भरणा करण्यास टाळाटाळ करणा-यांवर कठोर कारवाई करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. पालिकेच्या ई विभागातील माझगाव येथे सुमेर बिल्ट कार्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड यांचा भूखंड आहे. भूखंडाच्या करापोटी कर निर्धारण व संकलन विभागाने ११ फेब्रुवारी रोजी मागणीपत्र जारी केले होते. २१ दिवसांच्या विहित मुदतीत करभरणा न केल्यामुळे मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार जप्ती आणि अटकावणीची कार्यवाही करण्यात आली आहे. संबंधित संस्थेने १८ कोटी १ लाख ३६ हजार १६४ रूपयांचा करभरणा न केल्यास भूखंड लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच, मुलुंड येथील गव्हाणपाडा गाव येथे आर.आर. डेव्हलपर्स यांच्या नावे भूखंड असून भूखंडाच्या करापोटी कर निर्धारण व संकलन विभागाने ३० एप्रिल २०२४ रोजी मागणीपत्र जारी केले होते. विहित मुदतीत करभरणा न केल्यामुळे त्यांच्यावरही जप्ती आणि अटकावणीची कार्यवाही केली आहे. ३ कोटी ६२ लाख २० हजार ७०३ रूपयांचा करभरणा न केल्यास भूखंड लिलाव विक्रीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

## महानगरपालिका ५८० कंत्राटी सफाई कामगारांना कायम सेवेत घेणार



**मुंबई :** महानगरपालिका प्रशासनाने पालिकेत काम करणाऱ्या ५८० कंत्राटी सफाई कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याचा निर्णय घेतला आहे. कामगारांच्या पंचवीस वर्षांपासून सुरू असलेल्या लढ्यास अखेरीस यश मिळाले आहे.

महानगरपालिकेत १९९६-९७ साली ५८० सफाई कामगार कंत्राटी पद्धतीने रुजू झाले. मात्र, त्या कामगारांना महापालिकेत कायम सेवेत सामावून घेण्यासाठी कचरा वाहतूक श्रमिक संघाने पुढाकार घेतला. अनेक वर्षांपासून कंत्राटी कामगारांचा लढा सुरु होता. दरम्यान, या कालावधीत सुमारे ७० कामगारांचा मृत्यू झाला. तर ५६ कामगार वयोपरत्वे निवृत्त झाले. पालिकेत कायम सेवेत रुजू होण्यासाठी कामगारांनी न्यायालयाचे दार ठोठावले. याबाबत १९९९ ते २००४ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयात याचिकेवरील सुनावणी सुरु होते. त्यानंतर २००५ मध्ये न्यायालयाने हे प्रकरण मुंबईच्या औद्योगिक न्यायालयाकडे वर्ग केले. दरम्यान, २०१५ ते २०२१ या कालावधीत औद्योगिक न्यायालयात सुनावणी झाली. त्यात कामगारांचा मुद्दा ग्राह्य धरून २४० दिवसांपेक्षा अधिक दिवस काम केलेल्या कामगारांना कायम सेवेत घेण्याचे आदेश दिले होते.


निर्णय कामगारांच्या बाजूने लागल्यानंतरही पालिकेने न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे कामगारांनी औद्योगिक न्यायालयात पुन्हा दाद मागितली तेथे सफाई कामगारांच्या बाजूने निकाल लागला. त्या निकालाविरोधात महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने पालिकेची याचिका रद्द करून ५८० कामगारांना पालिकेच्या सेवेत सामावून घेण्याचा औद्योगिक न्यायालयाचा आदेश कायम ठेवला. दरम्यान, २००६ मध्ये १२४०, २०१७ मध्ये २७०० आणि आता ५८० अशा एकूण ४५२० कंत्राटी सफाई कामगारांना मुंबई महापालिकेने कायम सामावून घेतले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने आठ ते दहा दिवसांपूर्वी ५८० कंत्राटी कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार महापालिकेने प्रक्रिया सुरू केली आहे. कामगारांची पोलीस पडताळणी, अन्य अटी आणि नियमांची पूर्तता करून कामगारांकडून आवश्यक कागदपत्रे मागविण्यात येणार आहेत. लवकरच ही प्रक्रिया होईल, अशी माहिती महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

## हॉटेल्स, उपहारगृह मालकांनी मेन्यू कार्ड मराठीत करावं
### शिवसेना ठाकरे गटाची मागणी... जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**■मुंबई | प्रतिनिधी :**

मराठीच्या मुद्यावरुन राज्यातील राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं पाहायला मिळत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भैय्याजी जोशी यांनी मराठीबाबत केलेल्या वक्तव्याच्या विरोधात शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. आता दुकानांच्या मराठी पाट्यानंतर, मुंबईतील हॉटेल्स, उपहारगृह, दुकान मालकांनी मेन्यू कार्ड देखील मराठीत करण्याचा आग्रह शिवसेना ठाकरे गटानं केला आहे. मुंबई जिल्हाधिकाऱ्यांनी मराठीत मेन्यू कार्ड आणि हॉटेल बिल करण्यासाठी सूचना द्याव्यात, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाकडून जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे करण्यात आली आहे. इतर राज्यात ज्याप्रमाणे स्थानिक व्यावसायिक, दुकानदार हॉटेल मालक उपाहारगृहामध्ये भोजनसूची, मेन्यू कार्ड वर स्थानिक भाषेला प्राधान्य देतात. मात्र मुंबईत महाराष्ट्रमध्ये परिस्थिती काही प्रमाणात वेगळी असून येथे अनेक ठिकाणी मेन्यू कार्ड किंवा हॉटेल बिल देताना इंग्रजी भाषेला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे मुंबईतील सर्व हॉटेल्स, उपहारगृहमधील मेन्यू कार्ड वर त्यासोबतच हॉटेल बिल वर मराठी भाषेचा वापर करावा, अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेचे उपविभाग प्रमुख कृष्णा पवळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून केली आहे.



**भैय्याजी जोशींच्या वक्तव्यावर काय म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस?**

भय्याजी जोशींचं वक्तव्य मी ऐकलेलं नाही. ते मी ऐकून त्यावर मी बोलेन. मुंबईतील आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी भाषा शिकली पाहिजे, त्याला समजली पाहिजे. इतर भाषांचा इथे सन्मान आहे, कुठल्याही भाषेचा आम्ही अपमान करणार नाही. जो स्वतःच्या भाषेवर प्रेम करतो तोच इतरांच्या भाषेवर प्रेम करु शकतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

**नेमकं काय म्हणाले होते भैय्याजी जोशी?**

मुंबईत विविध राज्य, प्रांत आणि भाषा बोलणारे नागरिक राहतात. मुंबईत अनेक भाषा आहेत आणि घाटकोपरची भाषा गुजराती आहे, त्यामुळे मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी शिकलं पाहिजे असं नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत काम करणारा प्रत्येकजण ईश्वरी कार्य करत आहे. स्वयंसेवक नावाची ही शक्ती आहे, त्या शक्तीच्या रूपाने प्रत्येकजण काम करतो. जे स्वतःसाठी जगतात ते पशु समान असतात आणि दुसऱ्यासाठी जगतात ते खरे आयुष्य जगतात आणि त्यांनाच मनुष्य म्हणावे, असे भय्याजी जोशी यांनी म्हटले होते.

## पुण्यानंतर मुंबईत भयानक घटना
# १२ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार



**■कोल्हापूर | प्रतिनिधी :**

विद्येचं माहेरघर पुण्यानंतर मुंबईत अतिशय धक्कादायक घटना घडली आहे. अवघ्या १२ वर्षीय मुलीवर पाच जणांनी बलात्कार केलाय. पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली असून पुढील चौकशी सुरु करण्यात आली आहे. २४ फेब्रुवारी रोजी घरातून गायब झालेली मुलगी २७ फेब्रुवारी रोजी पालिसांना भेटली. पण तोपर्यंत फार उशिर झाला होता. मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी मुलीवर अत्याचार करण्यात आले. दादर रेल्वे स्थानक परिसरात आढलेल्या मुलीने पोलिसांना २४ ते २७ फेब्रुवारी दरम्यानचा घटनाक्रम सांगितला.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी मुंबईतील जोगेश्वरी येथे तिच्या नातेवाईकांसोबत राहत होती. २४ फेब्रुवारी रोजी मुलगी घरातून गायब झाली. पीडित मुलीच्या काकांनी २६ फेब्रुवारी रोजी जोगेश्वरी पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. मात्र मुलगी सापडली नाही.

याच दरम्यान, मुलगी २७ फेब्रुवारी रोजी दादर रेल्वे स्थानकात एकटीच असल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं. पोलिसांना संशाय आला आणि त्यांनी मुलीची चौकशी केली. तेव्हा त्या १२ वर्षांच्या मुलीने तिच्यावर झालेल्या अत्याचाराची पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर दादर पोलिसांनी मुलीला जोगेश्वरी पोलिसांच्या ताब्यात दिलं.

तपासात मिळालेल्या माहितीनुसार, एका एसी मॅकेनिकने मुलीचं अपहण केलं. मुलीला एकटी पाहून आरोपींनी तिला जोगेश्वरीतील संजय नगर भागात असलेल्या त्याच्या घरी नेले. जिथे २६ फेब्रुवारीच्या रात्री तीन तरुणांनी तिच्यावर आळीपाळी बलात्कार केला. त्यानंतर २७ फेब्रुवारी रोजी मुलीने तिघांच्या तावडीतून स्वतःची सुटका केली.

जोगेश्वरी येथून स्वतःची सुटका केल्यानंतर पीडित मुलगी घाटकोपरपर्यंत पोहोचली. त्यानंतर अन्य दोन पुरुषांनी तिली मदद करतो असं सांगत मरीन ड्राईव्ह आणि त्यानंतर दादर येथे घेऊन गेले. दोघांनी देखील मुलीवर अत्याचार केले. २४ ते २७ फेब्रुवारी दरम्यान मुलीसोबत अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांनी याप्रकरणी पाचही आरोपींना अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घरात भांडण झाल्यामुळे मुलगी घर सोडून गेली होती. सीसीटीव्हीच्या माध्यमातून पोलीस प्रकरणाचा तपास करत आहेत. १२ वर्षीय मुलीवर झालेल्या घटनेनंतर महिलांसाठी सर्वात सुरक्षित समजल्या जाणाऱ्या मुंबई शहरातही महिलांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**आरोपीचे उडवाउडवीची उत्तरं**

दरम्यान स्वारगेट एसटी आगारातील बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडेची गुन्हे शाखेने लष्कर पोलीस ठाण्यात तीन तास कसून चौकशी केली. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश संखे यांनी चौकशी केली. मात्र, गाडे पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे देत असल्याची माहिती समोर आली आहे. गाडेचा मुक्कम सध्या लष्कर पोलीस ठाण्याच्या कोठडीमध्ये आहे. या गुन्ह्याचा तपास स्वारगेट पोलिसांकडून नुकताच गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. हा तपास खंडणीविरोधी पथकाकडे सोपविण्यात आला आहे. तपासादरम्यान दत्ता गाडे याने उडवाउडवीची उत्तरं दिली.

## स्वारगेट बलात्कार प्रकरणातील पीडितेच्या 'त्या' प्रश्नाने पोलीस निरुत्तर...

**■लातूर | प्रतिनिधी :**

पुण्याच्या स्वारगेट बसस्थानकात गेल्या आठवड्यात शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षांच्या तरूणीवर अत्याचार करण्यात आला. आरोपी दत्ता गाडे याने तरूणीला फसवून दुसऱ्या बसमध्ये नेलं आणि तिथे तिच्यावर एकदा नव्हे दोनदा अत्याचार केला, त्यानंतर तो फरार झाला. अनेक तासांच्या शोधमोहिमेनंतर पोलिसांनी त्याला त्याच्या गुणाट गावातून बेड्या ठोकून अटक केली. न्यायालयाने त्याला १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडीही ठोठावली. दरम्यान या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा तपास आता गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. त्यानंतर गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी पीडित तरूणीशी संवाद साधला. मात्र त्यावेळी पीडितेने विचारलेल्या एका प्रश्नामुळे अधिकारीदेखील निरुत्तर झाले आहेत.

पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्वारगेट अत्याचार प्रकरणाचा तपास ताब्यात घेण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले होते. त्याप्रमाणे तपास गुन्हे शाखेकडे वर्ग झाल्यानंतर गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी पीडित मुलीशी संवाद साधला होता. मात्र त्यावेळी पीडित तरूणीने अधिकाऱ्यांना एकच सवाल विचारला. 'माझ्या बदनामीला जबाबदार कोण?' असा प्रश्न त्या तरूणीने अधिकाऱ्यांना विचारला, पण त्यांच्याकडे त्या प्रश्नाचं काहीच उत्तर नव्हतं. तो प्रश्न ऐकून तपास अधिकारी देखील निरुत्तर झाले.

## सरकारी रुग्णवाहिकेसाठी फोन केला
### ६ तासांत रुग्णवाहिका आली नाही... रुग्णाने सोडले प्राण

**■उल्हासनगर | प्रतिनिधी:**

राज्यात सरकारी रुग्णवाहिकेसाठी १०८ क्रमांकावर फोन केला जातो. त्यानंतर काही वेळेतच रुग्णवाहिका येत असल्याचा दावा केला जातो. परंतु उल्हासनगरमध्ये वेगळाच प्रकार घडला. अत्यवस्थ असलेल्या रुग्णास नेण्यासाठी सरकारी रुग्णवाहिकेला फोन केला. परंतु एक तास झाला, दोन तास झाले तरी रुग्णवाहिका आली नाही. फोन केल्यावर सहा तास झाल्यावरही रुग्णवाहिका आली नाही. अखेर चिंताजनक प्रकृती असलेल्या त्या रुग्णाने प्राण सोडला. या प्रकरणात विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित झाला. त्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर मनोहर बनसोडे यांचे निलंबन करण्यात आले. उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर मनोहर बनसोडे यांचे निलंबन करण्यात आले आहे. मध्यवर्ती रुग्णालयात प्रकृती चिंताजनक असलेल्या रुग्णावर योग्य उपचार झाले नाहीत आणि त्याला दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यासाठी तब्बल ६ तास सरकारी रुग्णवाहिका आली नाही, याबाबत ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. विधानसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशात याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित झाला. त्यानंतर डॉक्टर बनसोडे यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत त्यांचे निलंबन करण्यात आले.



## पेटलेला नारळ अन् मानवी कवटीसोबत अघोरी प्रकार
# पेणच्या नाडे गावात रात्रीस जादूटोणा चाले

**■पेण | प्रतिनिधी :**

अंधश्रद्धाविरोधी कायदे आणि या कायद्याच्या अंमलबजावणीचे आदेश राज्य शासनानं दिलेले असतानाही महाराष्ट्रात मात्र अद्यापही या आणि अशा कैक कृतींवर चाप बसलेला नाही. काही दिवसांपूर्वीच कोल्हापुरात घडलेल्या घटनेनंतर आता रायगड जिल्ह्यातील पेण इथंसुद्धा जादूटोणा केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात असलेल्या नाडे गावात पैशाचा पाऊस पाडण्यासाठी जादूटोणा करण्याचा प्रकार ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे उघडकीस आला. स्मशानभूमीत मध्यरात्रीनंतर पैशांचा पाऊस पाडण्यासाठी जादूटोणा करण्याचा प्रकार सुरू होता ही बातमी समजताच स्थानिक ग्रामस्थांनी स्मशानभूमीत धाव घेतली. तिथं जाऊन जादूटोणा करणाऱ्या व्यक्तींना हटकले असता हा अघोरी प्रकार करणाऱ्या टोळीने ग्रामस्थांच्या अंगावर गाडी घालून पोबारा करण्याचा प्रयत्न केला.

योग्य वेळी तिथं पेण पोलिसांनी धाव घेत या टोळीतील तिघांना जेरबंद केलं. ज्यानंतरस त्यांचे इतर साथीदार फरार असल्याची माहिती समोर येत आहे. नवी मुंबई आणि गावातील काही स्थानिकांकडून स्मशानभुमी शेडमध्ये प्रेत जाळण्याच्या ठिकाणी एका जिवंत व्यक्तीला फिरवत होते. नारळ, लिंबु, शंख, मानवी कवटी, अगरबत्ती , डमरू, पेटलेला नारळ, गोमुत्र भगवे कापड , होमाच्या समिधा, हातातील नाडा, भस्माची डबी इत्यादी साहित्यांचा वापर करुन हा प्रकार सुरू होता. मात्र तो ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे उघड झाला. याप्रकरणी जादूटोणा विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार लोकांचा शोध सुरू आहे.



**कोल्हापुरातही घडलेली अशीच एक घटना...**

कोल्हापुरच्या भुदरगड तालुक्यात काही दिवसांपूर्वीच आकुर्डे - महालवाडी दरम्यान असणाऱ्या कुराण नावाच्या शेतातील गवताच्या माळावर अघोरी जादूटोण्याचा प्रकार उघडकीस आला. तिथं असणाऱ्या बाभळीच्या झाडाला लिंबू, दाभण, बाहुल्या अडकवण्यात आल्या होत्या. बाभळीच्या झाडावर दाबण, लिंबूमधून काही शालेय मुलींसह व्यक्तींचे फोटो देखील लटकवल्याचं समोर आलं, ज्यानंतर या परिसरात भीतीचं वातावरण पसरलं होतं.

## पार्ले -जी कंपनीशी संबंधित अनेक ठिकाणी छापे

पार्ले-जी कंपनीशी संबंधित अनेक ठिकाणी छापे मारण्यात आले आहेत. पार्ले -जी कंपनी आयटीच्या रडारवर आहे. मुंबईमध्ये या कंपनीशी संबंधित अनेक ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. पालेर्जी हा बिस्किटांचा मोठा ब्रॅण्ड आहे. पार्ले-जी कपंनी आयटीच्या रडारवर आहे. पार्ले-जी कंपनीशी संबंधित मुंबईतील अनेक ठिकाणी आयटीकडून छापेमारी करण्यात आली आहे. पार्ले-जी हा बिस्किटचा मोठा ब्रँण्ड आहे. त्यामुळे मुंबईत पार्ले -जी कंपनीशी संबंधित असलेल्या ठिकाणावर अचानक पडलेल्या या छाप्यांमुळे खळबळ उडाली आहे. कर चोरी प्रकरणात पार्ले-जी कंपनी आयकर विभागाच्या रडारवर आहे. अजूनही मुंबईच्या काही ऑफीसमध्ये छापेमारी सुरूच आहे. मुंबई आणि गुजरातच्या वेगवेगळ्या ऑफीसमध्ये छापेमारी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. पार्ले-जी कंपनीने जे काही आर्थिक व्यवहार केले आहेत, त्यामध्ये त्यांनी करचोरी केल्याचा संशय आयकर विभागाला आहे. याच पार्श्वभूमीवर आज सकाळपासून पार्ले-जी कंपनीशी संबंधित मुंबई आणि गुजरातमधील ठिकाणावर आयकर विभागानं छापे घातले आहेत. व्हिले पार्लेमध्ये मोठं कार्यालय आहे, तिथे आयकर विभागाकडून छापेमरी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. यासोबत मुंबईत इतर काही ठिकाणी कंपनीशी संबंधित ठिकाणांवर आयकर विभागाकडून छापेमारी करण्यात आली आहे.




**गुजरातमध्ये छापेमारी**

पार्ले-जी कपंनी आयटीच्या रडारवर आहे. पार्ले-जी कंपनीने जे काही आर्थिक व्यवहार केले आहेत, त्यामध्ये त्यांनी करचोरी केल्याचा संशय आयकर विभागाला आहे. याच पार्श्वभूमीवर ही छापेमरी सुरू आहे. आयकर विभागाकडून मुंबई सोबतच गुजरातमधील या कंपनीशी संबंधित कार्यालयांवर आयकर विभागानं छापेमारी केली आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे. त्यामुळे आता या छापेमारीतून आयकर विभागाच्या हाती काय लागणार? हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

पार्रे-जी ही बिस्किट बनवणारी मोठी कंपनी आहे, बिस्किटांचा ब्रॅण्ड आहे. पालेर्जी




# घरातील या ठिकाणी चुकूनही ठेवू नये धन



**वास्तुशास्त्रात असे अनेक उपाय आहेत, जे रोजच्या जगण्यात अवलंबले तर धनाची देवी असलेली लक्ष्मी आपल्यावर प्रसन्न होते. त्याचवेळी जर वास्तुशास्त्राच्या या नियमांचे पालन केले नाही तर व्यक्तीला आयुष्यात पैशाची कमतरता भासते आणि घरात सुख, शांती, समृद्धी राहत नाही. जर तुम्हालाही अशा समस्येचा सामना करावा लागत असेल, तर वास्तुशास्त्रानुसार तुम्ही चुकूनही घरात या ३ ठिकाणी पैसे ठेवू नयेत. यामुळे पैसे तिजोरीत राहत नाहीत आणि लक्ष्मीच्या क्रोधाला सामोरे जावे लागू शकते. यासाठीच आजच्या या लेखातून जाणून घेऊयात अशा काही ठिकाणांबद्दल जिथे चुकूनही पैसे ठेवू नयेत.**

- **आर्थिक संकट येऊ शकते :** जर तुम्हाला एखाद्याकडून दागिने, घड्याळ आणि बॉक्स इ. भेट म्हणून मिळाले असेल, तर या सर्व गोष्टींसोबत पैसे ठेवू नका. असे मानले जाते की भेटवस्तू दिलेल्या वस्तू पैशांसोबत ठेवल्याने आर्थिक समस्या निर्माण होतात आणि पैशांची कमतरता निर्माण होते.
- **या गोष्टी लक्षात ठेवा :** एक गोष्ट लक्षात ठेवावी की तिजोरीजवळ नेहमीच स्वच्छता असावी. अशी धार्मिक श्रद्धा आहे की, धनाची देवी लक्ष्मी केवळ स्वच्छ ठिकाणीच राहते. याशिवाय, तिजोरीजवळ कोणतीही तुटलेली वस्तू ठेवू नका. अशी चूक करणे अशुभ मानले जाते आणि पैशाशी संबंधित समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.
- **तिजोरी अंधारात ठेवू नका :** जर तुम्हाला वास्तुदोष टाळायचे असतील तर घरात चुकूनही तिजोरी अंधारात ठेवू नका. वास्तुशास्त्रानुसार, तिजोरी अंधारात ठेवल्याने वास्तुदोषाची समस्या उद्भवू शकते. तिजोरी ठेवण्यासाठी उत्तर दिशा शुभ मानली जाते. या दिशेला तिजोरी ठेवल्याने संपत्ती वाढते आणि आयुष्यात कधीही पैशांची कमतरता भासत नाही.
- **लक्ष्मी देवी रागावू शकते :** घरातील बाथरूमजवळ तिजोरी ठेवणे टाळावे. अशी चूक केल्याने घरात नकारात्मक ऊर्जा वास करते. याशिवाय कामात अनेक अडथळे येऊ शकतात.

# मुलांच्या या सवयींकडे करू नका दुर्लक्ष

**मुलांना लहानपणीच लागणाऱ्या सवयी त्यांच्या भविष्यातील व्यक्तिमत्त्वाच्या आणि वर्तनाचा एक भाग होऊन जातात. या सवयीमुळेच मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत जाते. बऱ्याचदा पालक मुलांच्या या सवयींकडे दुर्लक्ष करतात याचा परिणाम भविष्यात होतो. त्यामुळे तुमचे मूल ज्यावेळी चुकते त्याचवेळी त्यांच्याशी कठोर वागावे, जेणेकरून त्यांना आपल्या चुका वेळेवर कळतील आणि भविष्यात पुन्हा या चुका घडणार नाहीत. आज आपण जाणून घेऊयात मुलांच्या कोणत्या सवयींकडे कधीही दुर्लक्ष करू नये याबद्दल.**

## शिस्त

मुलांना वेळीच शिस्त लावा. जर मुलांना योग्य वेळी शिस्त लावली नाही तर भविष्यात नुकसान होऊ शकते. कालांतराने याचे वाईट परिणाम तुम्हालाच भोगावे लागू शकतात. त्यामुळे मुलांमध्ये शिस्त असणे खूप महत्त्वाचे आहे.

## उद्धटपणा

जर तुमचे मूल तुमच्याशी उद्धटपणे बोलत असेल तर वेळीच त्यांना आवर घाला. उद्धटपणे बोलायची सवय त्यांना भविष्यात धोकादायक ठरू शकते.



## खोटे बोलणे

जर तुमचे मूल वारंवार खोटे बोलत असेल तर ही एक गंभीर समस्या आहे. यामुळे मुलं कायमस्वरूपी खोटे बोलायला शिकतात. अशा वेळी तुम्ही मुलांना खोटे बोलण्याने काय होते ते सांगा. खोटे बोलण्याची मुलांची सवय खूप वाईट असते. खोटे बोलल्यानंतर मुले चुकीच्या मार्गावर जाऊ लागतात.

## हिंसक वर्तन

जर तुमचे मूल हिंसक वर्तन करत असेल तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. आता नजरेआड टाकलेली ही सवय नंतर अधिक धोकादायक बनू शकते. तुम्ही तुमच्या मुलाला शांततेचे महत्त्व शिकवले पाहिजे.

## चोरी करणे

मुलांना लहानपणी चोरी करण्याची सवय लागताना दिसते. जर तुमची मुले चोरी करत असतील, तर ही एक गंभीर समस्या असू शकते. तुम्ही या सवयीकडे दुर्लक्ष केले तर भविष्यात ती अधिक धोकादायक बनू शकते.



# दिवसभर फ्रेश राहण्यासाठी करा या ड्रिंक्सचे सेवन



जंक फूडमध्ये पोषक तत्त्वांची कमतरता असते, ज्यामुळे तुमच्या शरीराला योग्य पोषण मिळत नाही आणि दिवसभराच्या धावपळीमुळे आणि तणावामुळे तुमच्या शरीरातील ऊर्जा कमी होते. तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये पोषक तत्त्वांचा समावेश केल्यामुळे तुम्हाला अनेक आरोग्यदायी फायदे होतात. अशा परिस्थितीमध्ये दिवसभर फ्रेश राहण्यासाठी तुम्ही काही विशेष पेयांचा समावेश करणे गरजेचे आहे.

नारळ पाण्याचे सेवन केल्यामुळे तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात पोषक तत्त्वे मिळतात ज्यामुळे तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात ऊर्जा मिळण्यास मदत होते. नारळ पाण्याचे नियमित सेवन केल्यामुळे उन्हाळ्यातील डिहायड्रेशनपासून तुम्हाला आराम मिळतो.

आवळा, बीट आणि गाजरचा ज्यूस प्यायल्यामुळे तुमच्या शरीराला ऊर्जा मिळण्यास मदत होते. या रसाच्या सेवनामुळे तुमच्या शरीरातील रक्तदाब नियंत्रित राहाण्यास मदत होते.

ड्रायफ्रूट शेकमध्ये असलेले कार्बोहायड्रेट्स आणि नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला पुरेशी ऊर्जा देतात.

मिक्स फळांचा ज्यूस प्यायल्यामुळे तुमच्या शरीरातील ऊर्जा टिकून राहते. ओट्स तुमच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात.

ओट्सची स्मूथी प्यायल्यामुळे वजन नियंत्रित ठेवण्यास आणि शरीराला ऊर्जा मिळण्यास मदत होते.



## Recipe

# पालक पोहे वडे




**साहित्य** - पालक - २ वाटी, पोहे - १ वाटी, साबुदाणा - १/२ वाटी, हिरवी मिरची - ४, दही - १ वाटी, कोथिंबीर - १/२ वाटी, खाण्याचा सोडा - चिमूटभर, मीठ - चवीनुसार

**कृती** - प्रथम साबुदाणा साधारण ७ ते ८ तास भिजत घालावा. पोहे १- २ मिनिटे पाण्यात भिजत ठेवावे. नंतर त्यातील संपूर्ण पाणी काढून १० मिनिटे झाकून ठेवा. पालक बारीक चिरून घ्यावा.

नंतर भिजलेल्या पोह्यात पालक, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, मीठ, खाण्याचा सोडा चिमूटभर, कोथिंबीर घालावी.

हाताला तेल लावून एकजीव करून घ्यावे.

प्लास्टिकवर वडे थापवून घ्यावे. गुलाबी होईपर्यंत तळून घ्यावे. आता तळलेले वडे प्लेटमध्ये काढून त्यावर दही घालावे. वरून कोथिंबीर घालून सजावट करावी. आता वडे खाण्यास तयार आहेत.



# ग्लोइंग स्किनसाठी मध आणि सीड्स

**आपली त्वचा सुंदर आणि तजेलदार दिसण्यासाठी आपण अनेक प्रयत्न करत असतो. अनेक स्किनकेअर रुटीन फॉलो करतो परंतु बऱ्याचदा आपल्याला पाहिजे तसा परिणाम मिळत नाही. ग्लोइंग आणि सुंदर स्किनसाठी तुम्ही मध आणि सीड्सचा वापर करू शकता. हा एक नैसर्गिक उपाय आहे. आज आपण या लेखातून जाणून घेऊयात ग्लोइंग स्किनसाठी मध आणि सीड्स किती फायदेशीर आहे याविषयी.**

चेहरा सॉफ्ट बनवण्यासाठी मधात नट्स आणि सीड्स मिसळा.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते चेहऱ्यावरील डाग आणि मुरुम कमी करण्यासाठी तुम्ही काही काजू आणि बिया मधात मिसळून खाऊ शकता.

दररोज नाश्त्यानंतर भोपळा, सूर्यफूल, तीळ आणि नट्स मधात मिसळून खाल्ल्याने तुम्हाला काही महिन्यात फरक जाणवेल.

या काजू आणि बियांमध्ये भरपूर प्रमाणात झिंक असते. झिंकमुळे त्वचा, केस चांगले राहतात आणि रोगप्रतिकारशक्तीदेखील वाढते.

यामध्ये असलेले व्हिटॅमिन ई आणि सेलेनियमसारख्या गुणधर्मांमुळे त्वचा निरोगी राहते.

**मध :-** मध नैसर्गिक मॉइश्चरायझर असून त्यामध्ये अँटीबॅक्टेरियल आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. ज्यामुळे त्वचेतील आर्द्रता टिकते आणि नैसर्गिक चमक आणते.

**सीड्स :-** फ्लॅक्स सीड्स, चिया सीड्स आणि सूर्यफुलाच्या बिया यांसारख्या सीड्समध्ये ओमेगा-3 फॅटी ॲसिड, जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेच्या पेशींना पुनरुज्जीवित करतात आणि त्वचेचा पोत सुधारतात.

**ग्लोइंग स्किनसाठी मध आणि सीड्स कसे वापरावे?**

डाएटमध्ये तुम्ही रोज सकाळी कोमट पाण्यात १ चमचा मध आणि काही चिया सीड्स घालून पिणे फायदेशीर असते.

जर तुम्हाला फेस मास्क बनवायचं असेल तर मध आणि दही किंवा ओट्स एकत्र करून त्वचेला लावल्यास नैसर्गिक ग्लो येतो.

रोजच्या आहारात सीड्स समाविष्ट केल्यास त्वचेचा पोत सुधारतो.

नियमित वापराने त्वचा निरोगी, हायड्रेटेड आणि नैसर्गिकरित्या चमकदार राहते.



# प्रख्यात गणितज्ज्ञ डॉ. मंगला नारळीकर


## तिची गोष्ट



**गणित म्हणजे अक्षरशः घाबरगुंडी उडवणारा किचकट विषय. गणित म्हटलं की अनेकांच्या छातीत धडकी भरते. पण याच गणिताला आपला मित्र बनवून लहान विद्यार्थ्यांमध्येही गणिताची आवड निर्माण करण्याचे काम केले ते डॉ. मंगला जयंत नारळीकर यांनी. पूर्वाश्रमीच्या मंगला राजवाडे यांचा जन्म १७ मे १९४३ मधला. त्यांनी मुंबई विद्यापीठातून १९६२ साली गणित विषयातून बीए पदवी मिळवली. त्यानंतर १९६४ मध्ये गणितातच एम. ए.ची पदवी त्यांनी मिळवली. या परीक्षेत त्या विद्यापीठातून पहिल्या आल्या. याकरिता त्यांना सुवर्णपदकही मिळाले. १९६५ मध्ये त्यांचा विवाह सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्याशी झाला.**

त्या टीआयएफआर या संस्थेत गणित विभागात सहायक संशोधक व त्यानंतर सहयोगी संशोधक म्हणून काम पाहत होत्या. १९८१ मध्ये मंगलाताईंनी विश्लेषणात्मक संख्या सिद्धांतावर संशोधन प्रबंध सादर करून मुंबई विद्यापीठाची डॉक्टरेट संपादन केली. १९८९ च्या दरम्यान त्यांनी आणि जयंत नारळीकर यांनी मिळून 'आयुका'या अंतराळशास्त्रातील संशोधनाला चालना देणाऱ्या संस्थेची स्थापना केली.

डॉ. मंगला नारळीकर यांनी अनेक इंग्रजी व मराठी पुस्तके लिहिलेली आहेत. लहान मुलांना सोप्या भाषेत गणित समजावून सांगण्यात त्यांचा हातखंडा होता. शालेय विद्यार्थ्यांसाठीचे गणिताच्या सोप्या वाटा, गणिती गप्पा, नभात हसरे तारे, पहिलेले देश, भेटलेली माणसं हे प्रवासवर्णन यासारखी त्यांची पुस्तकं विशेष गाजली. त्यांनी काही वर्षे 'बालभारती'मध्ये देखील गणिताच्या पाठ्यपुस्तक मंडळावर काम केले. लहान मुलांची गणिताची पुस्तकं अधिक सोपी आणि आकर्षक व्हावीत, त्यांच्यात गणिताची आवड वाढीस लागावी यावर त्यांचा भर होता.



वयाच्या ४३ व्या वर्षी मंगलाजींना कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने हुलकावणी दिली होती. केमोथेरपी, रेडिएशन आणि पोटात घेण्याच्या गोळ्या असे उपाय सुरू होते. कोणतेही गणित हे अचूक पायऱ्या पार पाडून सोडवलं तरच सुटतं हे त्यांना पक्कं माहीत होतं. म्हणूनच की काय, कर्करोग झाल्यानंतर त्यांना अनेकांनी विविध सल्ले दिले तरीदेखील कोणत्याही अंधश्रद्धेला बळी न पडता आधुनिक विज्ञानाच्या आधारे त्या आपलं कर्तव्य पार पाडत राहिल्या. सर्व वैद्यकीय उपचारांमुळे जवळपास ३३ वर्षे त्या निरोगी राहिल्या. मात्र दुसऱ्यांदा झालेल्या कर्करोगाशी दोन हात करताना त्यांचे १७ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले.

## संपादकीय

# जा जरा इतिहासाकडे...



संपादक दिपक मोरेश्वर नाईक




आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज, पुण्याजवळील आंबेगाव येथे शिवसृष्टी, कोकणातील संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराज, मराठ्यांच्या शौर्याप्रीत्यर्थ हरियाणातील पानिपत येथे, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या गौरवार्थ मुंबईत, साताऱ्यातील नायगाव येथे आद्य शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या आणि सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे इत्यादी मान्यवरांच्या स्मरणार्थ स्मारके उभारली जाणार असून त्याबाबतचा तपशील अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी सादर केलेला विद्यमान सरकारचा पहिला अर्थसंकल्प ठसठशीतपणे देतो.

याखेरीज मुंबईत स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे आणि येथीलच चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणार्थ उभारल्या जात असलेल्या स्मारकांचा उल्लेखही या अर्थसंकल्पात आहे. तसेच त्यात आहे महानुभाव पंथीयांच्या श्रद्धास्थानांच्या विकासाचे आश्वासन. यापैकी काही स्मारकांसाठी किती निधी उपलब्ध करून दिला जाईल याचा स्पष्ट उल्लेख अजितदादा करतात. उदाहरणार्थ शिवसृष्टीसाठी ५० कोटी रु. तर बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी २२० कोटी रु. उपलब्ध करून दिले जातील, असे अर्थसंकल्प सांगतो. पण इतरांच्या स्मारकांबाबत मात्र 'पुरेसा निधी' इतकेच अर्थसंकल्प म्हणतो. हा दुजाभाव का? अर्थमंत्री अजितदादांनी ऐन भाषणात 'छत्रपती संभाजी महाराज की जय' अशी घोषणा केली; पण छत्रपती संभाजी महाराजांच्या संगमेश्वर येथील संभाव्य स्मारकासाठी किती निधी देणार ते मात्र अर्थमंत्री सांगत नाहीत. महाराष्ट्राचा इतिहास अत्यंत देदीप्यमान आहे हे कोणीही अमान्य करूच शकत नाही. तेव्हा हा इतिहास घडवणाऱ्या महापुरुषांचे स्मरण विद्यामान आणि आगामी पिढ्यांस करून देणे रास्त. पण भविष्य घडवेल अशा वर्तमानकालीन कर्तृत्वाची वानवा असेल तरीदेखील इतिहासात आधार शोधावा लागतो. आपल्या पहिल्या अर्थसंकल्पात अजितदादांनी इतकी इतिहास आळवणी करण्यामागे हे कारण आहे किंवा काय असा प्रश्न या अर्थसंकल्पीय भाषणावरून पडू शकतो. कारण राज्याची औद्योगिक प्रगती, शैक्षणिक सुधारणा, आरोग्य आदी महत्त्वाच्या क्षेत्रांतील लक्ष्यपूर्तीसाठी सरकार काय करू इच्छिते आणि ते कसे, किती काळात केले जाणार याबाबत या अर्थसंकल्पातून काही दिशादर्शन होणे अपेक्षित होते. त्याऐवजी अजितदादा इतिहासातच अधिक रमले. अर्थसंकल्पाकडे लक्ष असते ते सरकार औद्योगिक आघाडीवर, धोरणात्मक पातळीवर काय करू इच्छिते- त्यावर काही भाष्य होते किंवा काय- याकडे. अजितदादा औद्योगिक विकास, त्यातून संभाव्य रोजगार निर्मितीचे मोठमोठे आकडे इत्यादी सादर करतात खरे. पण अधिक तपशिलाबाबत मात्र 'लवकरच' जाहीर होणाऱ्या 'औद्योगिक धोरणा'कडे बोट दाखवतात. म्हणजे अत्यंत महत्त्वाच्या औद्योगिक धोरणाची नागरिकांनी वाट पाहायची पण त्याच वेळी इतिहासातील महापुरुषांची स्मारके, स्मृती इत्यादींचा उल्लेख मात्र अर्थसंकल्पीय भाषणात. यावरून सरकारची प्राथमिकता काय हा प्रश्न नागरिकांस पडल्यास गैर ते काय? विशेषतः राज्यावरील कर्जाचा बोजा नऊ लाख कोटी रुपयांवर जात असेल आणि या कर्जाच्या केवळ व्याजापोटी वर्षाला तब्बल ६५ हजार कोटी रुपये खर्चण्याची वेळ सरकारवर येत असेल तर इतिहासादी बाबींपेक्षा अर्थसंकल्पात अधिक भरीव काही असणे गरजेचे ठरते. अजितदादा त्या आघाडीवर गप्प. उपलब्ध आकडेवारीवरून दिसते ते असे की सरकारच्या तिजोरीत येणाऱ्या प्रत्येक रुपयातील सणसणीत ५६ पैसे केवळ वेतन, कर्ज मुद्दल परतफेड, व्याज यांवरच खर्च होताना दिसतात. म्हणजे उरलेल्या ४४ पैशांत राज्याचा संसार चालवायचा, हे आव्हान. राज्य चालवण्यापेक्षा सर्व लक्ष सरकार कसे चालवता येईल यावर. त्यात दिल्ली विधानसभा निवडणुकीआधी केंद्राने आठव्या वेतन आयोगाची घोषणा केली आहे. राज्य सरकार हा आयोग टाळू शकणार नाही. असे झाल्यास वेतनादी खर्चाचे प्रमाण किती वाढेल याच्या कल्पनेनेच झोप उडावी. अशा वेळी महसूलवृद्धीसाठी सरकार काय करू इच्छिते हे नागरिकांस सांगता आले असते तर आधार वाटला असता. त्या आघाडीवर अर्थसंकल्पाचे मौन चिंता वाढवणारे खरेच. कारण आधीच वस्तू-सेवा कराने (जीएसटी) राज्यांच्या महसूलवृद्धीच्या मार्गांचा चांगलाच संकोच केलेला आहे. राज्य सरकारे त्यामुळे ना विक्री कर वाढवू शकतात ना उद्योगांस आकर्षून घेण्यासाठी अन्य करांत काही सवलती देऊ शकतात. अशा परिस्थितीत राज्य अबकारी (स्टेट एक्साइज) कर आणि मुद्रांक शुल्क यांखेरीज महसूलवृद्धीसाठी करण्यासारखे राज्य सरकारच्या हाती काही नसते. एका बाजूने उत्पन्न वाढवण्यावर मर्यादा; पण दुसरीकडे खर्चवाढीवर मात्र नियंत्रण नाही, ही आपली अवस्था. गेल्या वर्षी जुलैपासून या महिन्याच्या अखेरपर्यंत 'लाडकी बहीण' योजनेवर सरकारचा खर्च ३३ हजार कोटी रुपये इतका होईल. पुढील वर्षी तो ३६ हजार कोटी रुपयांच्या घरात जाईल. यातून सरकारने या योजनेतील लाभार्थींच्या संख्येस किती कात्री लावली हे जसे दिसते तसेच कोणत्याही परिस्थितीत सरकार यावरील महिन्याची रक्कम १५०० रु.वरून २१०० रु. इतकी वाढवू शकत नाही, हेही दिसते. निवडणुकीच्या आधी ही रक्कम वाढवण्याचे आश्वासन विद्यमान सत्ताधाऱ्यांनी दिले होते. ते आता पाळता येणार नाही. तेव्हा यावरून राजकारण होणार हे उघड. अर्थमंत्री आपल्या संकल्पात ४५ लाख कृषी पंपांना मोफत वीज पुरवण्याची भाषा करतात. राज्याचे वीज मंडळ तोट्यात असताना ही दानशूरता कशासाठी?

विशेषतः भांडवली खर्चात स्पष्टपणे दोन टक्के कपात करण्याची वेळ सरकारवर आलेली असताना खर्च वाढवणाऱ्या योजना सरकार कशा राबवणार? सरत्या आर्थिक वर्षात भांडवली कामांवर एकूण अर्थसंकल्पाच्या १३ टक्के इतकी रक्कम सरकारने खर्च केली. या वर्षीचा अर्थसंकल्प ही रक्कम ११ टक्क्यांवर आणतो, याचा अर्थ काय? भांडवली खर्च म्हणजे विकासासाठी आवश्यक उत्पादक घटक उभारणीसाठी असलेली रक्कम. गेल्या वर्षी अर्थसंकल्पात ही रक्कम ९२,७७९.६३ कोटी रु. असणे अपेक्षित होते. पुढे या क्षेत्रासाठी खर्चाचा पुनर्रचित अंदाज १,०९,०३१.४६ कोटी रु. इतका झाला. म्हणजे या भांडवली कामांवर अंदाजापेक्षा अधिक खर्च होणार असे सरकारने सांगितले. परंतु २०२५-२६ च्या सादर झालेल्या तपशिलानुसार हा खर्च ९३,१६५.५२ कोटी इतकाच होणार आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. सरकारला महत्त्वाच्या आणि दूरगामी भांडवली खर्चावर कपात करावी लागत असून अनुत्पादक खर्चास मात्र अपेक्षित कात्री लावता आलेली नाही. हे असे का होते हे उघड आहे. राजकारणासाठी लोकानुनयाचा आधार एकदा का घेतला की असेच होते आणि असेच होणार. अर्थसंकल्पोत्तर पत्रकार परिषदेत सत्ताधाऱ्यांना ''लाडकी बहीण योजनेतील रक्कम २१०० कधी होणार'' , हेच विचारले गेले आणि विरोधी नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या त्याही याबाबतच होत्या. अशा तऱ्हेने या लोकानुनयाचा एक सापळा तयार होतो आणि तो टाळण्यासाठी शहाणपणाचा नव्हे, तर अधिक लोकानुनयाचा मार्ग पत्करला जातो. महाराष्ट्रात हे सुरू आहे. अर्थसंकल्प सादर करताना आणि नंतर अजितदादांनी आर्थिक सुधारणा, आर्थिक शिस्त वगैरे माध्यमस्नेही शब्दांची पखरण केली. पण ती अगदीच निरुपयोगी ठरते. कारण राज्याच्या तिजोरीला लागलेली गळती! ती थांबवणे राजकीयदृष्ट्या धोक्याचे आणि न थांबवावी तर भविष्यासाठी विकास साध्य करणे अवघड. अशा वेळी सोपा मार्ग म्हणजे इतिहासाचा आधार. तोच अजितदादा घेतात. म्हणून त्यांचा अर्थसंकल्प 'जा जरा इतिहासाकडे' इतकेच काय ते सांगतो.

# अमूर्त शैलीचा जादूगार





चित्रकला विश्वात वासुदेव गायतोंडे यांचे नाव आदराने घेतले जाते, याचे कारण त्यांनी अमूर्त चित्रं चितारण्यात कारणी लावलेले आयुष्य. मराठी, भारतीय व जागतिक कलाविश्वासाठी त्यांचं काम अभिमानास्पद आहे. गायतोंडे यांना जाऊन २५ वर्षं झाली. त्यांच्या कामाचा दबदबा २१व्या शतकात वाढला तो 'ऑक्शन हाऊस' द्वारा, तसंच बोटावर मोजण्याइतक्या प्रकाशित साहित्यवजा पुस्तकांमुळे. मराठीत संग्रहित लेखांचं 'चिन्ह प्रकाशना'चं पुस्तक आलं. इतर काही दिवाळी अंकातील लेख प्रसिद्ध झाले. हिंदीत किंवा इंग्रजीमध्ये काही प्रमाणात त्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर वा त्यांच्या चित्रांवर लिहिलं गेले. दिल्लीमधील गॅलरीचा यांत समावेश होतो. मात्र इतर भारतीय भाषांत त्यांच्या कार्याचा प्रसार झालेला फारसा दिसत नाही. त्यांच्या कलेचा प्रसार जागतिक पातळीवर इंग्लिश बोलणाऱ्या देशांतही कमीच झाला, असं म्हणावं लागेल. अलीकडेच गायतोंडे यांच्यावरील मराठी पुस्तकाचं इंग्रजी भाषांतर करून पुस्तक प्रकाशित झाले आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. चित्रकलेची भाषा ही जागतिक भाषा आहे. तिच्यासाठी देशांच्या सीमारेषा आडव्या येत नाहीत, जशा वासुदेव गायतोंडे यांना झेन गुण तत्त्वज्ञानातील आशय आणि अधिष्ठानं प्रेरित करतात. अन्य संस्कृतीतील चैतन्यमय दृश्यांचा कलाकार स्वीकार करतो. कारण अंतर्ज्ञान व बुद्धिजन्य आवड म्हणून स्वतःचा शोध घेताना व्यक्तीची निकड वयानुसार वाढत जाते. त्याचा शोध चालू राहतो. हा शोध शांतताप्रिय असतो, याचा प्रत्यय वासुदेव गायतोंडे यांच्या चित्रांकडे पाहिल्यावर येतो. अशा चित्रांकडे पाहिल्यावर रसिक काय शोधतो, त्याला कोणत्या प्रकारचे समाधान प्राप्त होते, याची उत्तरे मिळण्यासाठी मायबोलीतील ज्ञान तपासणंही जरुरीचं असतं. तशी व्यवस्था मराठी भाषेत आहे का? त्याची उत्तरं शोधणं म्हटल्यावर एकंदरीत किती पुस्तकं, ग्रंथ मराठीत दृश्यकलेवर लिहिली गेली? किती चित्रकारांनी स्वतःची चरित्रं चित्रकलेच्या प्रभावांकित लिहिली आहेत? नक्की कोणते संदर्भ अशा विषयातील आहेत? काही सूचिबद्ध साहित्य वा उदाहरणं आहेत का? या प्रश्नांच्या उत्तरांसाठी काळाची प्रतीक्षा करावी लागेल, कारण वासुदेव गायतोंडे हे पहिलंच उदाहरण आधुनिक काळात झालं आहे. त्यांच्या उंचीचा मापदंड जागतिक पातळीवर जाऊन शोधावा लागतो. गायतोंडे यांच्या सर्व कलाकृतींकडे पाहिल्यावर एक स्थायीभाव लक्षात येतो तो म्हणजे रंगाची निवड. ती निवड त्यांचे स्वभावदर्शन घडविते. सामान्यपणे रसिकाला मोहून घेणारा रंगच असतो, जो लक्षवेधक ठरतो. पिवळ्या रंगाच्या छटा या वासुदेव गायतोंडे यांची मूळ पॅलेट आहे, त्यात इतर रंगाची मिसळण केलेली असते. या बदलत्या मिश्रणामुळे अनेक भाव प्रकट होतात. यातील प्रकाशाचा प्रभाव पडल्यावर मूळ पिवळे घटक अधिक कार्यरत होऊन छटा छायांचं प्रेक्षकासमोर प्रदर्शन नाट्य होतं. प्रकाशाच्या तीव्रतेसोबत त्याचा शांतपणे संवाद चालतो. ही प्रक्रिया बिंब व प्रतिबिंबसारखी नाही, तर रंगांचे आपसातील परिणामधारी रूपे असतात. ज्याला सजातीय माध्यम म्हटले जाते. प्रकाशीय रंगाचा प्रभाव धातू रंगावर पडून मानवाच्या डोळ्यांत परावर्तित होतात ते किरण प्रकाशाच्या तीव्रतेवर अवलंबून असतात. ते परिवर्तन हेच चित्रकार व रसिक प्रेक्षक यांच्या दरम्यानचे दुवे असतात. काव्याच्या भाषेत कुसुमाग्रजांची माळरान आणि त्यावरील गवताचा पालापाचोळा अशा आशयाच्या कविता घ्या. त्या हिरव्या पानांचा होणारा सोनेरी रंग आणि त्याचा उन्हाळ्यात होणारा पाचोळा, ज्याचा रंग बदलत जातो. अगदी शेणाचा गवरीचा रंग आठवा. पुढे पाचोळा जाळला की पारवे काळसर रंग. वणवा विझल्यावर सर्व माळराने या रंगाची दिसतात, अगदी चांदा ते बांदा अशी सगळी. ज्यांना भौगोलिक आत्मभान राहिलेलं असतं अशा महाराष्ट्रातील कवी आणि चित्रकार यांच्या चित्रात ते दिसतं. त्यांनी बालपणातील तीक्ष्ण निरीक्षणं नेणिवेनं गृहतिकांमध्ये रुपांतरित केलेली दिसतात. चित्र पाहणं किंवा न्याहाळणं हे आत्मिक आणि आद्य ज्ञान यांचं मिश्रण असतं. आध्यात्मिक प्रभाव आहे, असं फक्त बोलून भागत नाही. अध्यात्म नैसर्गिक देणगी आहे. त्यात निसर्ग व सृष्टी यांच्या नियमांचा अंतर्भाव असतो. बुद्धिजीवी जग निसर्ग, सृष्टी यातील लागेबंधे शोधण्यात मग्न असतात. तद्नंतर कर्ता त्यांची व्याख्या करण्यात पुढाकार घेतो. स्वतः वासुदेव गायतोंडे म्हणायचे, चित्र अमूर्त नसतं तर ते आकाररहित असतं. 'नॉन ऑब्जेक्टिव' जे काही आपण पाहतो, ते आकारहीन नसतं. कॅनव्हासवर रंग घेऊन आलेलं चित्र वास्तव आहे, ते अमूर्त नाही. तो एका आकारात पृष्ठभागावर रंगवलेला आकार निर्देशित करतो. रंगवलेला आशय, विषय, रचना, मांडणी ही चित्रकाराची साहसी आंतरिक विश्वाची अवकाशी अवस्था असते. हाच संदेश आणि विश्वास गायतोंडेंची चित्रलिपी वा कॅनव्हास देत राहतो. त्यात रंग, रेषा, पोत यांचा अभाव नसतो, तर ही जी काही मांडणी असते त्यातून शांततेचं पर्यावरण निर्माण झालेलं दिसतं. रंगाची उष्णता, आर्द्रता, दृश्याला शांतता बहाल करते. समुद्राची विशालता, अरण्याचा भयाण विस्तार, पर्वतांची उंची खोली, वालुकामय प्रदेशाचे क्षितिज आणि आकाशाचे टेकलेले उदयोन्मुख क्षेत्र, जिथे सूर्योदय व सूर्यास्त दिसतो. या विशालकाय परिस्थितीच्या अंतरेत घडणारे बदल अनुभवायला संवेदनशील शरीर व आत्म्याची जोड लागते तेव्हा कुठे शांततेची गाठभेट होते. शांततेचे रंग ओळखायला अशा एकांत अनुभवणाऱ्या पुरुषाची तोंडओळख असायला हवी. असे संदेश देणारे जीवात्मे जागतिक कलाविश्वाला फार कमी मिळालेत. रशियातील काझीमीर मालेविच, उत्तर अमेरिकेतील मार्क राथको, रशियात जन्मलेला मात्र जर्मनीत प्रसिद्ध असलेला वासिली कंडेन्स्की या काही कलाकारांनी आयुष्यभर ह्यनॉन ऑब्जेक्टिवह्ण घटकांचा शोध घेतला. ही मंडळी वासुदेव गायतोंडे यांची पूर्वपीठिका गिरवणारी ठरली आहेत. त्यांनी विसाव्या आणि एकविसाव्या शतकात आकारहीन घटकांची ओळख जगाला करून दिली. अकादमिक सरावाने आलेल्या गुणसंपन्न चातुर्याला दूर ठेवून स्वशैलीतून चित्रलिपी, चित्रभाषा निर्माण करणारे कलावंत अभावानेच निर्माण होतात. अशाच कलाकारांच्या सान्निध्यात चित्रकलेची नवीन भाषा अर्थपूर्ण होते. अशाच कलाकारांच्या कृतीने कलेला आर्थिक आधार दिला. भविष्यात त्यांच्या कलाकृतीचा शोध घेणं हे नव्या कलाकारांसाठी मुख्य ध्येय राहील. वासुदेव गायतोंडे यांच्या चित्रांचं कलात्मक मूल्य मोठं आहे. ते पुढेही कायम राहील.

# विश्वाच्या जननीचं जतन व्हायलाच हवं...

समाज माध्यमं म्हणजे अप्रत्यक्षपणे एकमेकांपर्यंत माहितीद्वारे पोहोचण्याची साधने. ज्यात प्रचंड उर्मी आहे एकत्रित खेचण्याची. उदा. वर्तमानपत्रं, मासिकं, रेडिओ, टेलीव्हिजन, इंटरनेट, फोन, मोबाइल, वेबसाइट इत्यादी इत्यादी... वर्तमानकाळापेक्षा भूतकाळात महिलांचं समाज माध्यम हे आमने-सामने असायचं. पूर्वीच्या काळात सुखसोयी नसायच्या आणि साहजिकच वार्षिक पुरवठ्याची कामे उदा. पापड, कुरडया, मसाले करणे हे एका बाईच काम नसायचं व या कामी एकमेकांची मदत लागायची. त्यानिमित्ताने शेजारीपाजारी महिला मदत म्हणून यायच्या. हेच पूर्वीच्या काळात त्यांचं समाज माध्यम होतं. कधी विहिरीवर पाणी आणायला जाता येता, हळदीकुंकूच्या निमित्ताने अथवा गौरी-गणपती / महालक्ष्मी पूजेच्या निमित्ताने एकत्र येणंही महिलांसाठी एक पर्वणीच होती. पूर्वीच्या काळात महिलांना मोकळेपणाने बोलून स्वतःच मत मांडायचं किंवा निर्णय घ्यायचं स्वातंत्र्य नव्हतं. कायम दडपणाखाली वावरत होत्या आणि जेव्हा कधी त्या या ना त्या कारणाने एकत्र आल्या की मग आपापल्या विचारांची देवाणघेवाण व्हायची. स्वतःची मतं मोकळेपणाने एकमेकांसमोर मांडली जायची. आपापल्या भावना व्यक्त करायची संधी मिळायची. चर्चा व्हायची आणि अशाप्रकारे मन हलकं होऊन, नवीन दिशा मिळायची व येणाऱ्या पुढील दिवसाला सामोरं जाण्याची शक्ती मिळायची. पूर्वीच्या काळी सणासुदीच्या निमित्ताने किंवा काही खास कार्यक्रमानिमित्ताने महिलांना माहेरी जायची संधी कधीतरी मिळायची. आपल्या माणसांच्या गाठीभेटी व्हायच्या. एखादी गोष्ट शिकायची तर, वर्ग लावून शिकून घ्यावं लागायचं, बाहेरगावी जायचं तर त्या गावचा नकाशा सोबत घेऊन जायला लागायचं. परदेशात रहाणाऱ्या मुलांकडून येणाऱ्या टपालची वाट आतुरतेने पाहात पालकाना बसावं लागायचं.

## मिरा भाईंदर महानगरपालिका

इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - 401 101, दुरध्वनी क्र. : 819 2828.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. मनपा/शिक्षण/१७२३/२०२५** **दिनांक : ०७/०३/२०२५**

### // Re – Tender Notice //

Mira Bhaindar Municipal Corporation invites sealed tenders form the two academic years of the year 2024-25 and the year 2025-26 for following works. Blank tender form of this tender dated **10/03/2025 to dt. On 19/03/2025** at 3.00 pm. The e- tendering of the Corporation will be available on the Government of Maharashtra's website http://mahatenders.gov.in till 3.00 pm. The hint amount, form fee will be accepted online through the online receipt system available on the e-tendering website. It should be noted. The tender for this work was called in two envelopes. On **20/03/2025** at 3.00 pm. These will be accepted online on the website till 3.00 pm. The tender was issued on. Will open on **24/03/2025.**

| Sr. No. | Particulars | Form Fees + GST Tax 18% | EMD Deposit |
|---|---|---|---|
| 1 | Regarding the supply of healthy food to the students of municipal kinder-garden schools. | 3000/- + 18% GST 3540/- | 50000 |

Tip –
1. Under the Micro and Small, Medium Enterprises Development Act, 2006, the enterprises registered as manufacturers are exempted from payment of tender fee and earnest money (EMD)
2. Incomplete form shall not be accepted.
3. Tender Form Fee is non-refundable.
4. Right is reserved to reject any or all tenders without assigning any reason thereof.

**Ref. No. MBMC/PRO/E-4498466/2024-25**
**Dt. 07/03/2025**

**(Prasad Shingte)**
**Dy. Commissioner (Education)**
**Mira Bhaindar Municipal Corporation**

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, ११ मार्च ते १७ मार्च २०२५

## महिलादिनापूर्वीच मुलींवर अत्याचार अल्पवयीन मुलीचा विनयभंग, तरुणीला लग्नाचे अमीष दाखवून फसवणूक

**ठाणे :** महिला दिनानिमित्ताने सर्वत्र विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असतानाच, भिवंडीत एका १० वर्षीय मुलीचा परिसरात राहणाऱ्या व्यक्तीने विनयभंग केला. तर दुसऱ्या एका प्रकरणात २४ वर्षीय महिलेला विवाहाचे अमीष दाखवून लैंगिक अत्याचार करण्यात आला. याप्रकरणी शांतीनगर आणि गणेशपुरी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. यातील पहिली घटना शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पिडीत मुलगी १० वर्षीय असून तिच्या आई-वडिलांसोबत भिवंडीतील एका भागात राहते. त्याच परिसरात ४० वर्षीय व्यक्ती वास्तव्यास आहे. तिचे आई-वडिल ६ मार्चला रात्री १२ वाजता त्यांच्या नातेवाईकांना सोडण्यासाठी बाहेर गेले होते. यावेळी त्यांनी मुलीला ४० वर्षीय व्यक्तीकडे सोपविले होते. पिडीत मुलीचे पालक घरी आल्यानंतर तो व्यक्ती तेथून निघून गेला. परंतु मुलगी घाबरलेल्या अवस्थेत होती. त्यामुळे त्यांनी पिडीत मुलीला विचारले असता, तिने घडलेला प्रकार सांगितला. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात पिडीत मुलीच्या आईने तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे, शांतीनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८ आणि १२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तर दुसरे प्रकरण गणेशपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहे. पिडीत २४ वर्षीय मुलीला तिच्या मित्राने विवाहाचे अमीष दाखवून तिच्यावर अनेकदा लैंगिक अत्याचार केले. याप्रकरणी भिवंडी शहर पोलीस ठाण्यात तिने तक्रार दाखल केली होती. हे प्रकरण ठाणे ग्रामीण पोलीस हद्दीतील गणेशपुरी भागात घडल्याने गणेशपुरी पोलीस ठाण्यात हे प्रकरण वर्ग करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात कातकरी कुटुंबांचे सर्व्हेक्षण युध्द पातळीवर सुरू...
## ठाणे जिल्ह्यात १२ हजार कातकरी कुटुंबियांना मिळणार पक्के घर

**ठाणे :** प्रधानमंत्री जनजाती गौरव दिनानिमित्त सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियानाला ठाणे जिल्ह्यात गती मिळत आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील आदिम जमातीतील १३ हजार ३२ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी १२ हजार २३७ कुटुंबे घरकुलासाठी पात्र ठरली असून त्यातील सहा हजार लाभार्थींना पक्के घर बांधण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. उर्वरित कुटूंबियांनाही लवकरच मंजूरी मिळणार आहे, त्यासाठी प्रक्रिया सुरु असल्याची माहिती जिल्हा परिषदे मार्फत देण्यात आली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनजाती गौरव दिनानिमित्त प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान सुरू केले आहे. देशातील ७५ विशेषतः असुरक्षित आदिवासी गटांचा विकास करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी देशात ४.९० लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. या अभियानांतर्गत सुरुवातीला ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ, भिंवडी आणि मुरबाड तालुक्यातील केवळ ३५ ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आला होता. परंतू मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केलेला पाठपुरावा आणि जिल्ह्यातील आदिवासी संघटनांकडून वेळोवेळी केलेली मागणी यांच्या विशेष प्रयत्नांनी केंद्र शासनाकडील सर्वेक्षणाचे लिंक पुन्हा सुरू करुन देण्यात आली. कातकरी कुटुंब या लाभापासून वंचित राहू नये, त्याअनुषंगाने सद्यस्थितीत ठाणे ग्रामीण भागामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वेक्षणाचे कामकाज वेगाने सुरू आहे. या अभियाना अंतर्गत जिल्ह्यात वर्षे २०२४-२५ करिता आदिम जमातीतील १३ हजार ३२ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यातून, १२ हजार २३७ लाभार्थी पात्र झाले असून ९ हजार ६८७ लाभार्थ्यांची नोंदणी पुर्ण करण्यात आली आहे, तर ६ हजार ४६२ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे. कोणतेही कुटुंब सर्वेक्षणापासून वंचित राहणार नाही याची विशेष दक्षता घेण्याबाबत सर्व तालुकास्तरीय यंत्रणेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचना दिले आहेत. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये सर्वेक्षण युध्द पातळीवर सुरू असून सर्वेक्षण अंतिम टप्यात आहे.

**तालुकानिहाय आकडेवारी**

**● तालुका सर्वेक्षण कुटुंबे पात्र लाभार्थी मंजूर घरकुल**
- अंबरनाथ ८६५ ९४१ ५५२
- भिवंडी ४,१०१ ३,९२१ १,८२९
- मुरबाड २,८९७ २,५२२ १,३४४
- शहापूर ४,०७९ ४५२ २,४०५
- कल्याण १,०१४ ८७७ ३३२

## रस्ते जोडणी आणि खोदकामामुळे सर्वत्र धुळीचे वातावरण
## घोडबंदर मार्गावरील कामांमुळे धुळधाण

**ठाणे :** घोडबंदर मार्गावर मुख्य आणि सेवा रस्त्यांच्या जोडणीबरोबरच रस्त्याच्याकडेला मोठ्या गटाराच्या बांधणीची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरू असून त्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून सेवा रस्त्यांवर अनेक ठिकाणी खोदाईची कामे सुरू आहेत. या कामादरम्यान उडणारी धुळ इतरत्र उडू नये यासाठी कामाच्या ठिकाणी पुरेशी काळजी घेण्यात येत नसल्याचे चित्र आहे. यामुळे खोदाई आणि रस्त्यावर इतरत्र पसरलेल्या माती धूळ इतरत्र उडत असल्याने नागरिक हैराण झाले असून या रस्त्याची अक्षरशः धुळधाण झाल्याचे दिसून येत आहे.



ठाणे शहरातील वाहतूकीसाठी मुंबई-नाशिक आणि घोडबंदर असे दोन मार्ग महत्वाचे मानले जातात. या मार्गांवर गेल्या काही वर्षांपासून मेट्रो मार्ग उभारणीचे काम सुरू आहे. याशिवाय, घोडबंदर येथील कासारवडवली चौकात उड्डाणपुल उभारणीचे काम सुरू आहे. या कामांमुळे दोन्ही मार्ग अरूंद झाल्याने येथे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून यामुळे नागरिक हैराण झालेले आहेत. असे असतानाच त्यात आता घोडबंदर मार्गावरील कामादरम्यान होत असलेल्या धुळ प्रदुषणामुळे नागरिक अक्षरश मेटाकुटीला आले आहेत. घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मुख्य आणि सेवा रस्त्यांच्या जोडणीची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतली आहेत. या कामांचा एक भाग म्हणून मुख्य आणि सेवा रस्त्यांच्या मधोमध असलेली ही गटारे बुजवून त्याऐवजी रस्त्याच्या कडेला गटारे उभारणीची कामे सूरू आहेत.

माजिवाडा ते ओवळापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला ही कामे सूरू आहेत. या कामांसाठी जागोजागी खोदाई करण्यात येत आहे. त्याजागी सिमेंट काँक्रीटची गटारे बांधण्यात येत आहे. या कामादरम्यान, कामाच्या ठिकाणी पुरेशी काळजी घेण्यात येत नसल्याने सर्वत्र धुळीचे चित्र आहे. या संदर्भात ठाणे महापालिकेच्या मुख्य प्रदुषण नियंत्रण अधिकारी मनिषा प्रधान यांच्याशी संपर्क साधला. मात्र, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माहिती व जनसंपर्क विभागाशी संपर्क साधूनही त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

रस्ते खोदताना किंवा रस्ता दुरुस्तीचे काम करताना वॉटर स्प्रिंकलर्स, रेन गन स्प्रिंकलरचा वापर करणे. ज्या रस्त्याचे काम चालू आहे, त्या रस्त्याच्या बाजूने मार्गरोधक बसविणे. बांधकाम साहित्याची वाहतूक करताना ट्रक ताडपत्रीने झाकलेले असावेत, असा नियम रस्ते कंत्राटदार, मेट्रोचे कामांसाठी नियमावलीत आहे. परंतु घोडबंदर सेवा रस्त्यांवर बांधण्यात येत असलेल्या गटारांवर अनेक ठिकाणी झाकणे दिसून येत नाहीत. यामुळे अपघात होण्याची भिती व्यक्त होत आहे.

## बेकायदा जाहिरात फलक पालिका विकणार भंगारात
## भंगार विक्रितून पालिकेला मिळणार प्रति किलोमागे २६ रुपये



**काय आहे प्रस्ताव**


ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा तसेच धोकादायक जाहिरात फलक स्वखचार्ने काढून घेणे आणि भंगारात विकून त्या मोबदल्यात पालिकेस प्रतिकिलो जास्तीत जास्त पैसे देणे या निकषावर आधारीत पालिकेने दोन वर्षांकरिता दर पत्रके मागविली होती. यामध्ये चारजणांनी दरपत्रके पालिकेकडे सादर केली होती. यानुसार नवी मुंबईतील मे. सादिक स्क्रॅप मर्चंट कंपनीने लोखंडी साहित्य प्रतिकिलो १५ रुपये तर, लाकडी साहित्यसाठी प्रति किलो २ रुपये असा दर दिला होता. ठाण्यातील मे. ब्राईट कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २३ रुपये ५ पैसे, मे. साईराज स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २६ रुपये २५ पैसे तर, मे. मुस्ताक स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २६ रुपये ७० पैसे असे दर पत्रक सादर केले होते. यापैकी मे. मुस्ताक स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीचे दरपत्रक स्विकारण्यास पालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिली असून यामुळे पालिकेला आता भंगार विक्रितून पालिकेला प्रति किलोमागे २६ रुपये ७० पैसे मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा तसेच धोकादायक जाहिरात फलक ठेकेदाराने स्वखर्चाने काढून भंगारात विकून त्या मोबदल्यात पालिकेला पैसे देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयानुसार पालिकेने दोन वर्षांसाठी भंगार विक्रिचा ठेका देण्यासाठी दरपत्रके मागविली असून यानुसार पालिकेकडे प्राप्त झालेल्या चारपैकी एकाचा दर २६ रुपये ७० पैसे इतका आहे. हा दर तीन दरपत्रकांपेक्षा जास्त असल्याने त्यास पालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिली आहे. यामुळे पालिकेला आता भंगार विक्रितून पालिकेला प्रति किलोमागे २६ रुपये ७० पैसे मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

घाटकोपरमधील जाहीराक फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर ठाण्यातील बेकायदा जाहीरात फलकांचा मुद्दा ऐरणीवर आला होता. यावरून टिका होऊ लागताच ठाणे महापालिकेने बेकायदा जाहीरात फलकांविरोधात कारवाई सुरू केली होती. या कारवाईत शहरातील ४९ जाहिरात फलकांवर पालिकेने कारवाई केली होती. ४९ पैकी ५ जाहिरात फलक पुर्णपणे निष्कासित करण्यात आले होते, तर परवानगी पेक्षा जास्त आकाराच्या ४४ जाहिरात फलकांचा अतिरिक्त भागाचा फक्त पत्रा काढण्यात आला होता. याशिवाय, पाालिकेने जाहिरात फलकांचे लोखंडी सांगाडे धोकादायक आहेत की नाही, याची पाहाणी करण्यासाठी संबंधित कंपनी मालकांना फलकांचे स्थैर्यता प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. यानुसार २६० जाहिरात कंपन्यांनी जाहिरात फलकांचे स्थैर्यता प्रमाणपत्र पालिकेकडे सादर केले होते. या पाठोपाठ आता पालिकेने बेकायदा आणि धोकादायक फलकांचे लोखंडी सांगाडे नियुक्त ठेकेदाराने स्वखर्चाने काढून घेऊन भंगारात विकणे आणि त्या बदल्यात पालिकेला किलोमागे पैसे देणे, असा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या संबंधीचा प्रस्ताव पालिकेने तयार केला होता. त्यास आयुक्तांनी मान्यता दिल्यानंतर तो प्रशासकीय सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यास प्रशासकीय सभेनेही मान्यता दिली आहे.

## कल्याण डोंबिवली पालिकेच्या ६१ शाळा सीसीटीव्ही निगराणीत... ५०२ सीसीटीव्ही कार्यान्वित

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिकेच्या ६१ शाळांमध्ये ५०२ सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. हे सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून हे सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिकेच्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.





शाळांमधील वाढते गैरप्रकार विचारातून घेऊन शासनाने शासकीय, खासगी, महापालिका शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे मागील वर्षी आदेश काढले होते. या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता भागवत यांना दिले होते.

पालिका हद्दीतील ६१ शाळांची तातडीने पाहणी करून सीसीटीव्ही शाळांमध्ये बसविण्याचे नियोजन विद्युत विभागाने केले होते. दोन महिन्यापासून हे काम सुरू होते. हे काम आता पूर्ण झाले आहे. पालिका शाळांमधील सीसीटीव्ही कार्यान्वित झाले आहेत. या सीसीटीव्हीचे नियंत्रण शाळेच्या मुख्याध्यापकांच्या दालनात ठेवण्यात आले आहे. मुख्याध्यापकांनी आठवड्यातून किमान तीन वेळा सीसीटीव्ही चित्रण तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या सीसीटीव्ही चित्रणात काही आक्षेपार्ह बाब आढळून आली तर ती माहिती मुख्याध्यापकांनी आपल्या वरिष्ठांना द्यावी. या समन्वयातून स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांकडे देण्यात आली आहे. सीसीटीव्हीमुळे शाळा, विद्यार्थी, शिक्षक यांच्यावर एका दालनातून नियंत्रण ठेवणे शाळा प्रमुखांना शक्य होणार आहे. अनेक वेळा शाळांना मे महिन्यात सुट्टी लागली की दिवसा, रात्रीच्या वेळेत शाळांमधील पंखे, खुर्च्या चोरट्यांकडून चोरीला नेण्याचे प्रकार वाढतात. सीसीटीव्हीमुळे हे प्रकार कमी होण्याची शक्यता शिक्षकांनी वर्तवली.

## भिवंडीत हॉटेलबाहेर फेकला जातो कचरा
## पालिका आयुक्तांनी घेतली हॉटेल मालक संघटनेबरोबर बैठक

**ठाणे :** भिवंडी शहरातील हॉटेल आणि बारमधील कचरा, शिल्लक राहीलेले अन्न याचा कचरा दैनंदिन स्वरुपात हॉटेलबाहेर फेकण्यात येत असल्याची बाब नवनियुक्त पालिका आयुक्त अनमोल सागर यांच्या निदर्शनास आली असून त्याची गंभीर दखल घेत त्यांनी मंगळवारी उपहारगृह मालकांच्या संघटनेबरोबर बैठक घेऊन कचऱ्याच्या डब्यांमध्येच कचरा टाकण्याची सुचना केली आहे. तसेच सर्व व्यावसायीक आस्थापनांसाठी घंटागाडीच्या वेळा आणि मार्ग निश्चीत करुन दिवसातुन दोन वेळा कचरा गोळा करावा अशा सुचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.



**नो वेस्ट झोन**

यापुढे ज्या क्षेत्रात सलग हॉटेल, खानावळ, बार असतील, त्या क्षेत्राला नो वेस्ट झोन म्हणून घोषीत केले जाईल. त्या ठिकाणी हॉटेल संघटनेच्या सहकायार्ने सुशोभीकरण करण्यात येईल. तसेच, यापुढे सर्व व्यावसायीक आस्थापनांसाठी घंटागाडीच्या वेळा आणि मार्ग निश्चीत करुन दिवसातुन दोन वेळा कचरा गोळा केला जाईल, असे आश्वासनही आयुक्तांनी दिले.

भिवंडी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी शहर स्वच्छतेवर भर देण्यास सुरूवात केली असून त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी शहरातील सर्व हॉटेल,बार, परमीट रुम मालक आणि त्यांच्या संघटनांसोबत बैठक घेतली. या बैठकीस अतिरीक्त आयुक्त देवीदास पवार, उपायुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे, जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांच्यासह पालिकेचे अधिकारी आणि हॉटेल, बार आणि परमीट मालक तसेच त्यांचे संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. हॉटेल मधील कचरा, शिल्लक राहीलेले किंवा वाया गेलेले अन्न याचा कचरा दैनंदिन स्वरुपात हॉटेल बाहेर फेकण्यात येत असल्याची बाब आयुक्त सागर यांच्या निदर्शनास आली होती. त्याची दखल घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी त्यांनी बैठक आयोजीत केली होती. शहर स्वच्छतेची जबाबदारी महापालिकेची आहेच. पण, त्याचबरोबर हॉटेल, बार, परमीट रुम मालक हे देखील शहराचे भागधारक आहेत. त्यामुळे त्यांच्या परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी ही त्यांची सुद्धा असणार आहे, असे त्यांनी बैठकीत सांगितले.

हॉटेल, बार, परमीट रुम चालक, मालक या सर्वांनी त्यांचे गाळ्याच्याबाहेर ओला कचरा आणि सुका कचरा यासाठी मोठे कचरा डबे ठेवावेत. तसेच त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी निर्माण होणारा कचरा त्यांनीच वर्गवारी करुन त्या डब्यांमध्ये टाकावा, अशा सुचनाही त्यांनी केल्या. यापुढे सर्व आरोग्य निरीक्षकांनी दोन ते तीन वेळा अचानक भेटी देऊन कचरा वर्गीकरणासाठी डब्बे ठेवले आहेत की नाही, तसेच, कचऱ्याचे वर्गीकरण होत आहे किंवा नाही याची पहाणी करावी. तसेच सकाळी किंवा संध्याकाळी घंटा गाडीने कचरा गोळा केल्यावर पुनःश्च मधल्या कालावधीत जमा होणाऱ्या कचऱ्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, अशा सुचना त्यांनी प्रशासनाला केल्या.

दररोज घंटागाडी उपलब्ध झाली पाहीजे, अशी मागणी हॉटेल मालकांनी यावेळी केली. तसेच, स्वच्छतेबाबत हॉटेल मालक देखील आग्रही असतात. परंतु अनेकवेळा नागरीक देखील हुज्जत घालत असल्याने त्यांचा नाईलाज होतो, असेही हॉटेल मालकांनी सांगितले. त्यावर अशा वेळी त्या त्या क्षेत्रातील आरोग्य निरीक्षकला कळविण्यात यावे. महापालिकेकडून त्यांना सहकार्य केले जाईल, असे आयुक्त सागर यांनी सांगितले.

## बाल'छळ'गृह...!!! मुलीचा छळ झाल्याचा पालकांचा आरोप

**ठाणे :** विविध गैरप्रकरणातून सुटका करून आणलेल्या मुलांना उल्हासनगर येथील बाल निरीक्षण गृहात ठेवण्यात येते. मात्र या बाल निरीक्षण गृहाचा कारभार वादात सापडला आहे. बालविवाहातून सुटका करून निरीक्षण गृहात ठेवलेल्या एका अल्पवयीन मुलीने इतर अल्पवयीन मुलींकडून आपला छळ झाल्याचा आरोप केला आहे. तर तिची सुटका करण्यासाठी निरीक्षण गृहाच्या व्यवस्थापनाने पैशांची मागणी केल्याचा तिच्या पालकांनी आरोप केला आहे. याबाबत जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांकडून चौकशी समिती नेमण्यात आली आहे. तर याच बाल निरीक्षण गृहातून मागील महिन्यात सात मुलींनी पळ काढल्याची घटना समोर आली होती. गेल्या दोन महिन्याच्या कालावधीत या घटनांमुळे या निरीक्षण गृहाचा कारभार वादात सापडला आहे.



**कारभारावर प्रश्नचिन्ह**

याच निरीक्षण करतात सुमारे एक महिन्यापूर्वी निरीक्षणगृहाच्या संरक्षण भिंतीवरून उड्या मारून सात मुलींनी पलायन केल्याची घटना समोर आली होती. यातील सहा मुलींचा शोध घेण्यास पोलीस प्रशासनाला यश आले असून त्यांची पुन्हा निरीक्षण गृहात रवानगी करण्यात आली आहे. एक मुलगी अद्याप बेपत्ता असून तिचा पोलिसांमार्फत शोध सुरु आहे. तर पुन्हा निरीक्षण गृहात आलेल्या मुलींची चौकशी केली असता गृहातील व्यवस्थापनावर त्यांनी बोट ठेवल्याची माहिती सूत्रांनी दिली.

बालविवाह, अवैध दत्तक प्रक्रिया, लैंगिक शोषण मारहाण यासारख्या विविध प्रकरणातून सुटका करून आणलेल्या बालकांची जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या उल्हासनगर येथील बाल निरीक्षणगृहात रवानगी करण्यात येते. याच पद्धतीने फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस उल्हासनगर येथील भाटिया हॉल येथे एका सोळा वर्षीय मुलीचा तिच्या पालकांनी बालविवाह लावून देण्याचा घाट घातला होता. जिल्हा बाल संरक्षण विभागाला याची माहिती प्राप्त होताच त्यांनी धडक कारवाई करून हा बालविवाह रोखला. नंतर मुलीला उल्हासनगर येथील बाल निरीक्षणगृहात ठेवले. मात्र या मुलीकडून आता आपला निरीक्षणगृहात इतर मुलींनी छळ केल्याचा आरोप केला जात असल्याची माहिती दिली आहे. तर याबत पालकांना विचारणा केली असता मुलीला सोडण्यासाठी निरीक्षण गृहाच्या व्यवस्थापनाने पैशांची मागणी केली असल्याची माहिती दिली.

२४ फेब्रुवारी रोजी विवाह रोखून संबंधित मुलीला उल्हासनगर येथील बाल निरीक्षण गृहात ठेवण्यात आले होते. यावेळी निरीक्षण गृह व्यवस्थापनाने आपल्याला लादी पुसणे, भांडी घासणे, झाडू मारणे यांसारखी कामे दिल्याचा आरोप मुलीने केला आहे. तसेच ही कामे न केल्यास निरीक्षणगृहातील इतर मुलींकडून आपल्याला धमकवल्याचा आरोपही मुलीने केला आहे. त्यामुळे मुलीला मानसिकरित्या धक्का पोहोचला असून तिच्यावर उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

"संबंधित मुलीचा बालविवाह थांबवून तिच्या सुरक्षेच्या दृष्टीने तिला उल्हासनगर येथील बालनिरीक्षण गृहात ठेवले होते. मुलीने आणि तिच्या पालकांनी केलेल्या आरोपातील सतत्या तपासण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात आली आहे. याचा अहवाल लवकरच येणार आहे."

–संतोष भोसले, जिल्हा महिला बालविकास अधिकारी, ठाणे

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com